# २७. आतला आवाज -२

चला मित्रांनो जंगलातील सफर करायला.

एका जंगलात सिंह, सिंहीण व त्यांचे बछडे रहात असतात. एक दिवस एक बछडा वाट चुकतो व कोल्हयाला मिळतो. कोल्हीणीला बछडयाबद्यल प्रेम वाटते व तो बछडा कोल्हयाच्या इतर पिल्लांबरोबर मोठा होतो व कुई कुई करतो.

एक दिवस सिंह त्या कोल्हयाच्या कळपाकडे बघतो. त्याला भास होतो की आपला हरवलेला बछडा या कळपात आहे. तो धावून जातो. त्या बरोबर सर्व कोल्हे पळून जातात. पण बछडा काही पळत नाही. कारण त्याला भिती वाटत नाही. सिंह त्याला विचारतो कि तू कोण आहेस ? बछडा कुई कुई करतो. सिंह ओरडतो की तू कुई कुई काय करतोयस ? तू तर गर्जना केली पाहिजेस कारण तू सिंहाचा छावा आहेस. आता गर्जना करतोस की देऊ पेकाटात लाथ. त्याबरोबर तो छावा गर्जना करतो व त्याचे त्याला खूप आश्र्चर्य वाटते. सिंह व तो छावा आपल्या कळपात निघून जातात.

काय आला का मतितार्थ ध्यानात ?

आपलेही असेच असते. परिस्थितीच्या रेटयापाई आपल्याला आपला आतला आवाज व आपले व्यक्तिमत्व यांचा विसर पडतो.

अशावेळी कोणाची खंबीर साथ नसेल तर मनुष्य जीवनाच्या महासागरात गटांगळया खातो.

स्वतःला जर गुण ओळखता येत नसतील तर ते काम प्रसंगी वाईटपणा घेऊन शिक्षक, पालक, मोठी भाऊ/बहिण, बॉस, सहकारी यांनी केले पाहिजे. पण नेमके हेच घडत नाही. आधीच १ नाहीतर २ मुले. त्यांना घडविणे म्हणजे ते मागतिल ते देणे. त्यांच्या मनाविरूद्ध न वागणे व त्यामुळे मुलांचा इगो त्यांच्या आकारापेक्षा वाढत जातो. त्यांची खरी ओळखच त्यांना होत नाही. कारण वाईटपणा घ्यायला कोणीच तयार नसतो. जो वाईटपणा घेतो त्याला नावे ठेवली जातात. (टिकाकार, मत्सरी ह्यांना चांगले बघवतच नाही वगैरे. )

पूर्वीच्या काळी एकत्र कुटूंबपद्धतीत हा प्रश्न फारसा पडत नसे. कारण कुटूंबातील इतर वडिलधा-यांचा मुलांवर वचक असे. एवढेच कशाला मुलांच्या पालकांवर सुद्धा आजी / आजोबांचा धाक असे. काळाबरोबर एकत्र कुटूंबपद्धती संपली. ‘ तूझे तू माझे मी ’ चा जमाना आला. कोणी कोणाच्या मध्ये पडायचे नाही असा अलिखित करार झाला.

मी तर असे म्हणेन की टिकाकार आपल्या शेजारी असावा. त्याचा राग करू नये तर त्याच्या बोलण्याकडे गांभीर्याने बघावे व आपल्यात सुधारणा घडवून आणावी.

मग होणार ना टिकाकार ? बघा प्रयत्न करून वाईटपणा आला तरी चालेल. अंतिम उद्देष चांगला असेल तर हरकत नाही.